**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३०/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश**
(पारीत दिनांक - १७.०३.२०२६)

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार सतीश व्यंकटय्या तिरंदास, रा. दाजीपेठ, सोलापूर यांनी त्यांच्या मालकीचे जप्त असलेले HERO MOTOCORP LTD कंपनीची HF DELUX मोटरसायकल जिचा नोंदणी क्रमांक MH-13/CM-0386 चेसिस क्रमांक MBLHA11ATG9J53453 इंजिन क्रमांक HA11EJG89J53453 ही सुप्रतनाम्यावर मिळण्याकरीता सादर केला आहे.

०२. अर्जदार यांनी सादर केले आहे की, त्यांचे वर नमुद वाहन हे त्यांच्या राहत्या घरापासून चोरीला गेले होते व त्याबाबत त्यांच्या मुलाने वळसंग पोलीस स्टेशन येथे वाहन चोरीस गेलेबाबत फिर्याद दिली होती व त्याप्रमाणे गु.र.क्र.३१/२०२६ भा.दं.वि. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान वळसंग पोलीसांनी अर्जात नमूद चोरीला गेलेली मोटरसायकल जप्त केली आहे. सदरचे वाहन हे अर्जदार यांच्या मालकीचे असून दैनंदिन वापरात ते आणतात. त्यांना त्या वाहनाचा ताबा न मिळाल्यास त्यांचे नुकसान होईल. त्यामुळे त्यांना त्या वाहनाचा सुप्रतनाम्यावर तात्पुरता ताबा देण्यात यावा अशी विनंती केली.

०३. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक ०५ वर दाखल केले असून उपरोक्त नमूद वाहन क्रमांक असलेली मोटरसायकल त्यांनी सदर गुन्हयात जप्त केल्याचे मान्य केले आहे व योग्य त्या अटीवर अर्जदारास देणेस त्यांची कोणतीही हरकत नाही असे नमूद केले आहे. सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्रमांक ०५ च्या मलपृष्ठावर त्यांचे म्हणणे दाखल करून अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

०४. अर्जाचे, उत्तरांचे आणि दस्ताऐवजांचे अवलोकन केले. अर्जदार यांनी स्वतःच्या आधार कार्डाची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. त्यात ते नमूद ठिकाणचे रहिवासी असल्याचे निदर्शनास येते. अर्जदाराने दाखल केलेल्या एफआयआरच्या प्रतीचे अवलोकन करता तो अर्जदाराचा मुलगा दत्तात्रय तिरंदास याने दिला असल्याचे दिसते मात्र त्यामध्ये अर्जात नमूद मोटरसायकल ही त्याचे वडीलांचे नावे त्याने खरेदी घेतली होती असे नमूद आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या वाहन नोंदणी प्रमाणपत्राच्या पडताळणी केलेली प्रतीचे अवलोकन करता नमुद वाहन हे अर्जदाराच्या नावे मालक म्हणून दर्ज असल्याचे आढळते. त्यामुळे, अर्जदार हा जप्त केलेल्या वाहनाचा मालक असल्याचे प्राथमिकदृष्ट्या निष्पन्न होते. अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर कोणीही जप्त केलेल्या वाहनाबाबत हक्क प्रस्थापीत केलेला नाही व अर्जदाराच्या हक्काला आक्षेप वा ऊजर नोंदविलेला नाही. अर्जदाराने सदर वाहनावर त्याचा हक्क सिद्ध केल्याने तो अंतरीमरित्या त्या वाहनाच्या ताब्यास पात्र ठरतो. अर्जदाराचा अर्ज खालील आदेशाप्रमाणे निकाली काढण्यात येतो :-

## आ दे श

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येते.

२. अर्जदार सतीश व्यंकटय्या तिरंदास, रा. दाजीपेठ, सोलापूर हे त्यांच्या मालकीची जप्त असलेली HERO MOTOCORP LTD कंपनीची HF DELUX मोटरसायकल जिचा नोंदणी क्रमांक MH-13/CM-0386 चेसिस क्रमांक MBLHA11ATG9J53453 इंजिन क्रमांक HA11EJG89J53453 ही सुप्रतनाम्यावर अंतरीमरित्या मिळण्यास पात्र आहे व त्याला वर नमुद चेसिस आणि इंजिन क्रमांकाच्या तपासणी नंतर वाहन ताब्यात द्यावे.

३. अर्जदार सतीश व्यंकटय्या तिरंदास, यांनी सदर वाहन मिळाल्यानंतर त्या वाहनाच्या रंगात व स्वरुपात कुठलाही बदल करणार नाही, ते वाहन हस्तांतरण करणार नाही, कुठल्याही गुन्हयात वापरणार नाही व आदेशान्वये ते वाहन न्यायालयासमक्ष प्रस्तुत करेल अशी हमी घेवून त्याबाबत हमीपत्र (Indemnity Bond) रुपये १,५०,०००/- दाखल करेल.

४. अर्जदार हा जप्त असलेल्या वाहनाचा चहुबाजुंनी छायाचित्र स्वखर्चाने गैरअर्जदारांना काढून देईल व गैरअर्जदाराने ते दोषारोपपत्रासोबत दाखल करावे.

५. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येतो आणि प्रस्तुत प्रकरणातील सर्व दस्ताऐवज हे दोषारोपपत्राबरोबर जोडण्यात यावे.

17/03/26

(एम.एम. कल्याणकर)
प्र. न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी)
न्यायालय क्र.२, अक्कलकोट.

दिनांक :- १७.०३.२०२६